दिनांक १८.१२.२०२४

## नोटीस

संस्थेचे परिपत्रक दिनांक १७ डिसेंबर, २०२४ नुसार दरवर्षीप्रमाणे या वर्षीही संस्थेने **दिनांक २० डिसेंबर, २०२४ ला पुणे येथे संध्या ५.०० वाजता भाऊबीज समर्पण सोहळा** आयोजीत करण्यात आलेला आहे. तसेच पुणेबाहेरील शाखेतील सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांना कार्यक्रम बघता यावा यासाठी कार्यक्रमाची **Youtube Link** पाठविण्यात आलेली आहे व सर्वांनी कार्यक्रमात सहभाग घेण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

वरील बाब लक्षात घेता **दिनांक २० डिसेंबर, २०२४** रोजी सर्व शिक्षक , शिक्षेकत्तर कर्मचारी व विद्यार्थीनी यांची कार्यालयीन वेळ **सकाळी १०:३०** वाजेपासून कार्यक्रम समाप्ती पर्यंत निश्चीत करण्यात आलेली आहे. ~~परंतु ज्या कर्मचारी यांची डयुटी प्रथम वर्ष प्रात्यक्षीक परिक्षेमध्ये आहे. त्यांनी सकाळी नियमीत वेळेत महाविद्यालयास यावयाचे आहे.~~

तरी सर्व कर्मचारी यांनी दुपारी ४.५० वाजता महाविद्यालयाच्या सेमीनार हॉलमध्ये एकत्रित यावयाचे आहे, संध्याकाळी ५.०० वाजेपासून भाऊबीज समर्पण सोहळाचे थेट प्रक्षेपण याचा लाभ घ्यावयाचा आहे.

तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे याची सर्वांनी नोद घ्यावी.

सोबत :— मा. सचिवाचे पत्रक व कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका प्रत

Kmilind

**प्राचार्य**

## महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्था,कर्वेनगर,पुणे-५२

दिनांक : १७ डिसेंबर, २०२४

प्राचार्य/मुख्याध्यापिका/संचालिका/प्रमुख/व्यवस्थापक,

-------------------------------------------------------

स.न.वि.वि.

दरवर्षीप्रमाणे **शुक्रवार दि.२० डिसेंबर,२०२४ रोजी सायं.५.०० वाजता** भाऊबीज निधी समर्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यासाठी श्रीमती शेफाली वैद्य या प्रमुख वक्त्या आपल्याला लाभल्या आहेत. सोबत या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका पाठवित आहे. तरी सर्वांनी कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे.

आपल्या शाखेतील विद्यार्थिनींना या कार्यक्रमास अवश्य उपस्थित राहणेबाबत सूचित करण्यात यावे. कार्यक्रम चालू झाल्यानंतर कार्यक्रमाच्या मध्येच बरेचसे कर्मचारी व विद्यार्थिनी बाहेर निघून जातात असे निदर्शनास येत आहे. तरी आपण पूर्ण कार्यक्रम संपेपर्यंत कोणीही मध्येच उठून जाऊ नये याबाबत आपल्या शाखेतील कर्मचारी व विद्यार्थिनी यांना सूचना देण्याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच कार्यक्रम चालू असताना विद्यार्थिनी आपसात गप्पा मारत असल्याचे निदर्शनास येत आहे. यासाठी प्रत्येक शाखेने विद्यार्थिनींसमवेत आपले २ शिक्षक/प्राध्यापक यांना उपस्थित राहण्याबाबत सूचित करण्यात यावे. **सदर कार्यक्रमासाठी सर्व स्टाफची उपस्थिती अनिवार्य आहे याची कृपया नोंद घ्यावी.**

संस्थेतील प्रत्येक घटकास, विद्यार्थिनी व हितचिंतक यांना कार्यक्रमा सहभाग घेता यावा या उद्देशाने हा भाऊबीज निधी समर्पण कार्यक्रम यू ट्यूब चॅनेल वरून खालील लिंकद्वारे प्रसारीत करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. तरी आपल्या शाखेतील सर्व विद्यार्थिनीं, कर्मचारी व हितचिंतक यांचेपर्यंत कार्यक्रमाची लिंक व QR कोड पोहोचविण्याची व्यवस्था करावी.

दि.२० डिसेंबर, २०२४ रोजीची लिंक व QR कोड -

**https://www.youtube.com/live/KAdRzBVAld4?si=m0dj83dVMgeAhtvm**

कळावे,

सचिव



भारतरत्न महर्षी कर्वे



स्व. गो. म. चिपळूणकर

# महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था

**कर्वेनगर, पुणे ५२**

## ‖ हार्दिक निमंत्रण ‖

आत्मीय स्नेही,

सस्नेह नमस्कार !

संस्थेचे आजन्म सेवक स्व. गो. म. चिपळूणकर यांच्या संकल्पनेतून १९१९ साली भाऊबीज निधीची सुरुवात झाली. प्रति वर्षी समाजातून संकलित होणारा भाऊबीज निधी संस्थेला सुपूर्त करण्याचा समारंभ स्व. गो. म. चिपळूणकर यांच्या स्मृतिदिनी संपन्न होतो. त्यानुसार या वर्षीसुद्धा -

## भाऊबीज निधी समर्पण समारंभ

संपन्न होत असून या कार्यक्रमासाठी **अध्यक्ष** म्हणून

**श्रीमती स्मिता कुलकर्णी (उपाध्यक्ष, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था)**

तसेच **प्रमुख अतिथी** या नात्याने

**श्री. जयंत इनामदार (संचालक, स्ट्रडकॉम कन्सलटंट्स)**

आणि **प्रमुख वक्त्या** म्हणून

**श्रीमती शेफाली वैद्य**

**(सुविख्यात लेखिका, माध्यमतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या)**

हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**कार्यक्रम स्थळ**
रमा पुरुषोत्तम विद्या संकुल
कर्वेनगर, पुणे

विनीत

स्मिता घैसास
**अध्यक्ष**

**दिनांक / वेळ**
शुक्रवार, दि. २० डिसेंबर २०२४
सायं ५.०० वाजता

रवींद्र देव
**कार्याध्यक्ष**

विद्या कुलकर्णी
**उपकार्याध्यक्ष**

पी. व्ही. एस. शास्त्री
**सचिव**

**आणि**

**संस्थेचे व्यवस्थापक मंडळ व आजन्म सेवक मंडळ सदस्य**

https://www.youtube.com/live/KAdRzBVAld4?si=Z4WaYU8Tjbf5vpxD

सोबत दिलेल्या लिंक अथवा क्यूआर कोडच्या सहाय्याने कार्यक्रमात आभासी पद्धतीने सहभागी होऊ शकता.